**Indian Streams Research Journal**
Vol-1 Issue-4/May-2011
**ISSN: 2230-7850** Available online www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# श्री गुलाबराव महाराज व सवधर्मसमन्वयवाद

अरविंद देशमुख
सहयोगी प्राध्यापक
गो.सी.टोंपे
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सांदूरबाजार अमरावती

" धर्म " हा विषय अतिशय अवघड व संवेदनक्षम आहे. धर्म या छोटयाशा शब्दाने साऱ्या जगाच्या संस्कृतीला, मानवी जीवनाच्या उत्कर्षाला अधिष्ठान दिलेले आहे. धर्म हा माणसाचा ऐहिक व पारमार्थिक उन्नती साधणारा असतो. आपल्या भारत देशात बौध्द, जैन, ख्रिश्चन, इस्लाम व हिन्दू धर्म आहेत. जर या सर्व धर्माने सांगितलेले अंतिम सत्य एकच असेल तर यासर्व धर्मात समन्वय असावा का ? असा प्रश्न निर्माण होतो. श्री गुलाबराव महाराज हे स्वत: वैदिक परंपरेचे निस्सीम उपासक होते. वेदमार्गापासून जे जबरदस्तीने दूर गेले त्यांना पुन्हा वेदमार्गात आणण्यासाठी ऋषींच्याद्वारे परमेश्वरानीच वैदिककेत्तर धर्मांची स्थापना केली अशी धारणा श्री गुलाबराव महाराजांनी सर्वधर्म समन्वय याबाबत स्पष्ट भूमिका मांडली त्याचेच विवेचन प्रस्तुत शोधनिबंधात करण्यांत आले आहे

## सर्वधर्म समन्वयवाद म्हणजे काय ?

सर्वधर्मसमन्वयवाद म्हणजे विश्वातील सर्व धर्मात एकवाक्यता आणणे होय. "विविध धर्म एकहि जगह पहुंचनेवाले अलग-अलग रास्ते है और एकहि जगह पहुंचने के लिए अगर हम अलग-अलग रास्ते से गये । तो उसमे दुखका कोई कारण नही है।" असा सर्व धर्म समभावाचा विचार महात्मा गांधी यांनी विशद केला आहे. सर्व सामान्य जनतेवर या विचाराची पकड आहे. धर्माविषयी अनेक मते असल्यामुळे सर्वांची एकवाक्यता झाल्यावाचून खरा निश्चय कसा करावा ? परंतू सर्व धर्मात एकवाक्यता होणे अत्यंत कठीण आहे. याच अनुषंगाने श्री गुलाबराव महाराज यांनी सविस्तर विवेचन केले आहे.

## श्री गुलाबराव महाराजांचे सर्वधर्मसमन्वयवादाबाबत विवेचन

श्री गुलाबराव महाराज यांनी सर्वधर्मसमन्वयवादाबाबत अगदी स्पष्ट भूमिका मांडली आहे. आपण जितक्या अन्नचा पाक तयार करतो तितक्याचा काला करुन खाईन म्हटले तर त्यात विशेष काय आहे ? ज्या गोष्टीच्या मिळणीची ज्याच्याशी जरुर आहे तितकीच मिळणी करणे योग्य, अन्यथा

करण्यात फाजीलपणा होतो. 'अन्न' हा एक शब्द आहे पण एवढयावरुन सर्व अन्नाचा आपण काला करु लागलो तर त्यात मनुष्याची विष्ठाही टाकावी लागेल, कारण विष्ठा हे देखील कुत्र्याचे अन्नच आहे. चीनी लोकांचा बेडकाचा मुरब्बा काल्यात टाकला तर कसा शोभेल ? बरे शुध्द अन्नात तरी पहा. अनारशाशी कांदा खाणे शोभते काय ? लसनाची पेंड घालून तळलेल्या करंज्या कोणाला गोड लागतात? वृत्तिसाधकता व ज्ञेयध्येयसाध्यता ज्यांत उत्पन्न होईल तितक्याच्याच समन्वयाची आवश्यकता असते.

याप्रमाणे कधी लौकिक दृष्टान्तात तर कधी इतिहासातील व ग्रंथातील माहिती पुरवून कधी शब्दाचे खरे आशय विशद करुन तर कधी सडेतोड युक्तिवाद पुढे करुन, कधी व्याकरण, तर्क मीमांसा या सारख्या शास्त्रांची विवेचन पध्दती स्विकारुन तर कधी योगासारख्या अनुभूतिगम्य शास्त्राधारे अधिकारपूर्ण स्वमत सांगून गुलाबराव महाराजांनी सर्वधर्मसमन्वयवादाबाबत विवेचन केले आहे.

सृष्टीतील समस्त प्राणी सदैव सुखी राहोत, निरोगी राहोत, सर्वशुभ पाहोत आणि कोणालाही कदापि दुःख न होवो ही प्रार्थना वैदिक ऋषींनी संपूर्ण विश्वासाठी केलेली आहे.

सर्वेऽपि सुखिनः संन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ।

सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित दुःखमाप्नुयात ।

संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांचीही विश्वातील प्रत्येकाला त्याच्या वैयक्तिक अधिकारानुसार उध्दाराचा व सर्वांगिण कल्याणाचा मार्ग सांगण्याचीच भूमिका होती. श्री गुलाबराव महाराजांनीही या दुःखमय घोर संसारात स्वधर्म हाच एक आपला खरा मित्र आहे. कारण स्वधर्माचा त्याग केला असता पापकर्माकडे प्रवृत्ती होते । असे प्रतिपादन केले आहे.

हिन्दु धर्म हा सर्वसमावेशक आहे. विश्वातील सर्व धर्म सनातन वैदिक धर्माच्या शाखा आहेत. प्रत्येक धर्माची आचार पध्दती वेगळी असली तरी ' नराचा नारायण करणे ' हीच सर्व धर्मांची मूळ भूमिका आहे. मानवाची प्रगती होत जाईल, मानव स्वार्थाकडून दुसऱ्याच्या सुखाकडे व पुढे परमार्थाच्या दिशेने वाटचाल केली. तेव्हाच सर्व साधुसंत व धर्म संस्थापक यांनी ज्ञान उपासना, योग व भक्ति यांचा उपदेश करुन त्याला नराचा नारायण केले आहे.

हिन्दु धर्माने तलवारीच्या बळावर धर्मप्रचार केला नाही. भारतीयांनी धर्माबाबत नेहमीच सामंजस्याची भूमिका घेतली आहे. श्री गुलाबराव महाराज याबाबत असे म्हणतात की, "स्वधर्म आचरणात आणण्यास कठीण असला तरी तोच धर्म पाळावा. दुस-याचा धर्म सोपा व चांगला वाटतो म्हणून त्याचे पालन करु नये. तसे केल्यास श्रध्दानाश होते आणि श्रध्दानाश भितीदायक असून तो सर्वनाशाकडे नेणारा आहे. म्हणूनच स्वधर्मावर निष्ठा ठेवून तसे आचरण करणारेच मानवी जीवनाचे सर्वश्रेष्ठ उदिदष्ठ म्हणजे परमात्मसिध्दी प्राप्त करुन घेतात असे श्रीकृष्णाने अर्जूनाला सांगितले."

विश्वातील प्रत्येक धर्म आपलाच धर्म हा पृथ्वीवरील मूळ ' धर्म ' आहे असे प्रतिपादन करतो. तथापि या सर्व धर्मात 3000 वर्षापूर्वी कांही नव्हते . असे आहे ते म्हणणे भूगर्भशास्त्र दृष्टीनेही असंबध्द आहे. याचे प्राचीन पुरावे मध्य अमेरिका, युरोप, आफ्रिका, आशिया येथे उपलब्ध होत आहेत. जगात असे सर्वत्र प्राचीन धर्मांचे जे अवशेष मिळत आहेत. त्या सर्वात वैदिक संस्कृतीशी बरेच साम्य आढळते पण याचा अर्थ भारतातील प्राचीन आर्यांनी आक्रमण करुन तलवारीच्या जोरावर आपली संस्कृती सर्व जगात पसरविली असे नसून भारतात आणि भारताबाहेर सर्वत्र एकच संस्कृती प्राचीन काळी होती. एवढाच त्याचा अर्थ आहे. पण पुढे काळाच्या ओघात तिचा संकोच झला आणि भारतात ती परंपरेच्या जाणीवेसह आज थोडया वेगळया स्वरुपात का होईना पण कायम आहे. अमेरिकेतील मेस्किकोतील दूषण संस्कृती, चिलीतील प्राचीन पुरावे, मध्य अमेरिकेतील सापडलेले उत्खननातील अवशेष, आफ्रिकेतील 2000 जातीच्या धर्मातील अनेक धर्मकल्पनांची हिन्दु धर्माशी असलेली समानता या सर्वात श्री गुलाबराव महाराज यांनी शास्त्रीय पध्दतीने मांडलेले सर्वधर्म समन्वयाचे सुत्र अनुस्यूत आहे.

श्री गुलाबराव महाराज धर्मसमन्वयाबाबत अधिक विश्लेषण करतांना म्हणतात की, सर्व पृथ्वी एकच आहे, पण त्यावरील प्रत्येकाचे घर त्यांच्या गरजेप्रमाणे वेगवेगळे असते. तसेच मूळ सनातन धर्म एकच आहे, पण उपासनेचे संप्रदाय मात्र परिस्थितीनुसार आणि लोकांच्या योग्यतेनुसार भिन्न - भिन्न आहेत आणि म्हणून रोजच्या रोज जरी अनेक संप्रदाय निर्माण झले तरी श्री गुलाबराव महाराजांना त्यात आनंद वाटतो. समुद्रात उठणाऱ्या कोणत्याही लाटेत स्नान केले तरी ते समुद्रस्नानच होते, त्याचप्रमाणे कोणत्याही सांप्रदायिक धर्माचा आधार घेऊन एकनिष्ठेने उपासना केली तर परमेश्वर प्राप्ती होतेच हेच समन्वयाचे सुत्र सर्व संप्रदायात आहे व याची जाणीव श्री गुलाबराव महाराजांनी अत्यंत यथार्थपणे करुन दिलेली आहे.

स्वामी रामकृष्ण परमहंसांच्या जीवनात देखील आपल्याला याच भूमिकेचा आग्रह दिसतो. ते म्हणतात-- "कोणी कोणत्याही भावनेने आणि कोणत्याही रुपाने ईश्वराची आराधना करो. परमेश्वर एक आहे अशी दृढ श्रध्दा ठेवून जो साधना करील, त्याला भगवानप्राप्ती अवश्य होईल. ईश्वर एक आहे. परंतू त्याच्या विविध भावच्छटा आहेत. कुटूंब-प्रमुख एकच असतो. तो कोणाचा पिता, कोणाचा बंधू तर कोणाचा पती लागतो. त्याप्रमाणे भिन्न- भिन्न भावभावना असल्या तरी ईश्वर एकच आहे. प्रत्येक व्यक्तीने स्वधर्माचेच पालन केले पाहिजे. ख्रिश्चनांनी ख्रिश्चन धर्माचे पालन करणे, आणि मुसलमानांनी इस्लाम धर्माचे पालन करणे दूष्ट असते. हिन्दुसाठी प्राचीन हार्य ऋषींचा सनातन मार्गच श्रेयस्कर आहे. इतरांचे धर्म देखील सत्यप्राप्तीचे भिन्न- भिन्न मार्ग आहेत. हीच भावना खऱ्या साधकाने अंतःकरणात वागवली पाहिजे. दुसऱ्या धर्माविषयी श्रध्देचा भाव असला पाहिजे. "

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी याबाबत आपला अभिप्राय देताना इतरांच्या भावनेचा अवहेर न करता, आपला ऐहिक उत्कर्ष साधून, सर्वधर्माविषयी समभावना ठेवून आत्मसमाधान प्राप्त करावे असे सांगितले आहे

"आत्मरुपाची धारणा । सर्वांठायी समभावना ।

विश्वकुटूंब ऐशा आचरणा । धर्म म्हणावे निश्चये ।। 4 ।।

कोणाचा द्वेष न करुन । करावा ऐहिक उत्कर्ष पूर्ण ।

साधावे आत्मसमाधान । हाचि बाणा धर्माचा ।। 5 ।।"

वरील प्रमाणे वर्तमान स्थितीत संत व वैदिक संदर्भातून सर्वधर्म समन्वय समजून घेणे सर्वांच्या हिताचे आहे. याबाबत श्री गुलाबराव महाराज म्हणतात की, धर्माधर्म आपल्या इच्छेवर अवलंबून नाहीदत. सत्पुरुषाच्या मुखानेच धर्माधर्म समजून घ्यावेत. तसेच शास्त्रात सांगितलेले करणेच चांगले. पण आपल्या बुध्दीने शास्त्र पाहून होत नाही. तर ज्याला शास्त्र समजते त्याला विचारुन ते समजून घेतले पाहिजे म्हणून शास्त्र सत्पुरुषाच्या मुखानेच समजून घ्यावे

**सारांश :**

श्री गुलाबराव महाराज यांनी वरीलप्रमाणे ' सर्वधर्मसमन्वय ' याबाबत विवेचन केले होते. त्याचा मतितार्थ असा की, जगातील कोणताही धर्म चांगला किंवा वाईट असा नसतो. तर प्रत्येक धर्मातच नराचा नारायण करण्याचे तत्व अंतर्भूत असते. म्हणूनच प्रत्येक धर्मियांनी आपल्या परंपरा कायम ठेवून, स्वधर्मावर निष्ठा ठेवावी व आपले जीवन जगत रहावे पण त्याचबरोबर दुसऱ्या धर्माविषयी श्रध्दाभाव मनात बाळगावा. तरच सर्व धर्माचे धर्मानुयाची सुख समाधानाने राहतील एकूणच आज जगात जिथे धर्मासाठी संघर्ष सुरु आहे. तो किती निरर्थक आहे हेच श्री गुलाबराव महाराज यांच्या वरील विवेचनावरुफन लक्षात येते.

**संदर्भ :**


1) नित्यतीर्थ आळंदी महिमा, श्री. गुलाबराव महाराजः पंचलतिका ग्रंथ न्या, मुंबई

2) धर्मयज्ञ, प्रज्ञाचक्षु श्री गुलाबराव महाराज विशेषांक प्रकाशक : गीता फाऊंडेशन, मिरज, लेख आळंदी महिमा, डॉ. अलका इंदापवार

3) श्री गुलाबराव महाराजांची विचारसंपदा, डॉ. कृ.मा.घटाटे, प्रकाशक : प्रज्ञा चक्षु संत श्री गुलाबराव महाराज कात्सायनी शताब्दी ज्ञानयज्ञ महोत्सव समिती, माधान जि. अमरावती

4) साधुबोध, श्री गुलाबराव महाराज, विरचित प्रकाशक : श्री गुलाबराव महाराज सर्वोदय ट्रस्ट, आळंदी

5) प्रज्ञाचक्षु श्री गुलाबराव महाराज यांचे विचारवैभव प्रकाशक-- भारतीय विचार मंच, नागपूर

नित्यपाठ, प्रकाशक - श्री ज्ञानेश्वर सांप्रदायिक मंडळ, अमरावती.